# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे

Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५ Fax- ०२०- २६१२७००४

Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in


---

जा.क्र.पणन-५/कृउबास/परीपत्रक/सन२०२१ |(२६) दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०२१.

**परीपत्रक**

**विषय :- कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने पेट्रोलपंप व सीएनजी पंपाची उभारणी करणेबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पणन-५/इंडियन ऑ/बा.स./२०१८ दिनांक १८.०६.२०१८.

राज्यामध्ये एकुण ३०६ कृषि उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असुन मागील काह वर्षांची बाजार समित्यांची उलाढाल पहाता ती सातत्याने कमी होत असल्याचे दिसते. तसेच पर्यायी बाजार व्यवस्थेमुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यापुढे अनेक प्रकारची आव्हाने उभी राहिलेली आहेत. बाजार समित्यांनी परंपरागत पद्धतीने कामकाज चालू ठेवल्यास तसेच उत्पन्नाचे नवनवीन मार्ग न शोधल्यास भविष्यात काही बाजार समित्या अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायी बाजार व्यवस्था जरी उभी राहिलेली असली तरी गेल्या अनेक वर्षापासून बाजार समित्यांचे अस्तित्व आणि कामकाज लक्षात घेता कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी पणन व्यवस्थेमध्ये शेतकरी व इतर घटकांसाठी सक्षम पर्याय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी अनावश्यक बाबींवरील खर्च कमी करणेबाबत या कार्यालयाने दि.२४.१२.२०२० रोजी परीपत्रक निर्गमित केले आहे. तथापि बाजार समित्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने बाजार समित्यांनी उत्पन्नाचे विविध मार्ग शोधणे व त्याकरीता वेगवेगळे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

राज्यातील काही बाजार समित्यांनी त्यांच्या बाजार आवारात किंवा उपबाजार आवारात पेट्रोल पंप उभारणी केलेली आहे, ज्यामुळे बाजार क्षेत्रातील शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध झाली असून, बाजार समितीलाही नियमित उत्पन्न मिळत आहे. तसेच, वायु प्रदुषण नियंत्रणाच्या दृष्टीने वाहनांकरीता सीएनजीचा जास्तीत जास्त वापर करण्याबाबत केंद्रशासन व राज्यशासनाचे धोरण आहे. बाजार समित्यांनीही काळानुरुप सीएनजी पंपाची उभारणी केल्यास प्रदुषण कमी होण्यास मदत होईल व बाजार समित्यांच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना सुविधा मिळेल आणि पर्यायाने बाजार समित्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल.

यादृष्टीने ज्या बाजार समित्यांकडे जिल्हा मार्गावर, राज्य मार्गावर किंवा राष्ट्रीय महामार्गावर जागा उपलब्ध आहे, तसेच यासाठी आवश्यक निधी उपलब्ध असलेल्या बाजार समित्यांनी पेट्रोल पंप व सीएनजी पंप चालू करणेबाबत विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन, कार्यवाही करावी. तसेच, यासाठी बाजार समित्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याची आणि महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) मधील तरतुदीनुसार या कार्यालयाची परवानगी घ्यावी.

**(सतिश सोनी)**
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत :-

१. कृषि उत्पनन बाजार समिती, --------------(सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ------- (सर्व)
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर.

मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

कृउबास औबाद

Scanned by CamScanner